ITD Cem

Commitment, Reliability & Quality

Dept. of Corporate Services – Corporate Relationship,
BSE Limited,
Phiroze Jeejeebhoy Towers, Dalal Street,
Mumbai 400 023.

National Stock Exchange of India Limited,
Listing Department,
Exchange Plaza, C-1, Block 'G'
Bandra-Kurla Complex,
Bandra (East),
Mumbai 400 051.

| Date | Our Reference No. | Our Contact | Direct Line |
|---|---|---|---|
| 30th July,2018 | SEC/04/2018 | RAHUL NEOGI | 91 22 67680814 |

Dear Sirs,

**Unaudited Financial Results**
**Scrip Code No: BSE - 509496 / NSE - ITDCEM**

Further to our letter dated 27th July, 2018, we send herewith photocopies of paper cuttings from Free Press Journal and Navshakti both dated 29th July, 2018, calling a Board Meeting on Thursday, 9th August, 2018, to take on record the Unaudited Financial Results for the quarter and six months ended 30th June, 2018.

Thanking you,

Yours faithfully,
For ITD Cementation India Limited

(RAHUL NEOGI)
COMPANY SECRETARY

Encl: as above

# जागतिक खारफुटी दिवस साजरा

**वार्ताहर**

कल्याण, दि. २८ – जागतिक खारफुटी दिन म्हणून २६ जुलै हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. ठाणे तहसीलदार कार्यालय व पर्यावरण दक्षता मंडळ कल्याण डोंबिवली या संस्थेने हा दिवस खारफुटी विषयावरील व्याख्यान व खारफुटीची लागवड करून साजरा केला. कार्यक्रमाचे यजमानपद बी. के. बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्सच्या पर्यावरण विज्ञान विभागाने भूषविले होते.

खारफुटी विषयक माहितीपट आणि चर्चा या स्वरूपाच्या कार्यक्रमात कल्याणचे तहसीलदार अमित सानप, प्रांत अधिकारी प्रसाद उकरडे, तलाठी शिंदे, बिर्ला कॉलेजच्या प्रो. वंदना गुप्ता, प्रो. डॉ. क्रांती ओझरकर, प्रो. डॉ. कांतीलाल नागरे, प्रो. दिनेश वानुले आणि पर्यावरण दक्षता मंडळाचे डॉ. प्रसाद कर्णिक, समन्वयक रुपाली शाईवाले, ललिता अष्टेकर उपस्थित होते.

पर्यावरण दक्षता मंडळाचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम काळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कांदळवनांचे महत्त्व, त्यांचे प्रकार, कांदळवनांत आढळणारे जैववैविध्य, अनुकूलन, इ. विषय त्यांनी आपल्या भाषणात मांडले.

खारफुटीची वने तटरक्षकाची भूमिका बजावत असतात, त्यांच्यामुळेच पुराच्या पाण्यापासून मानवी वस्त्यांचा बचाव होतो. असे असतानाही बांधकाम, प्रदूषण, इ. कारणांमुळे खारफुटीची तोड केली जात आहे. मानवाच्या शाश्वत विकासासाठी त्यांचे संरक्षण व संवर्धन आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. त्यानंतर स्वच्छ खाडी अभियान' हा खारफुटी विषयक माहितीपट दाखवण्यात आला आणि पाण्याचे प्रदूषण, खाडी किनारी साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणांमुळे होणारे प्रदूषण, पाण्याची ढासळलेली गुणवत्ता, मत्स्य जीवनावर होणारा परिणाम इ. विषयांवर चर्चा करण्यात आली.

त्यानंतर डोंबिवली पश्चिम येथील देवीचा पाडा – सातपूल जेट्टी येथे खारफुटीच्या ३० रोपांची लागवड बिर्ला कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यात आली. याप्रसंगी पर्यावरण दक्षता मंचच्या सचिव संगीता जोशी, गोदरेज मॅन्ग्रोव्ह सेलचे हेमंत कारखानीस, मा. राजन सामंत आदी मान्यवर उपस्थित होते.

# शासनाच्या स्थगिती आदेशाला अंतरिम स्थगिती देण्यास उच्च न्यायालयाचा नकार

**वाघिवली भूखंड वाटप प्रकरण**

**वार्ताहर**

नवी मुंबई, दि. २८ – वाघिवली येथील संरक्षित कुळांचा हक्क डावलून सिडकोने इराईसा डेव्हलपर्सला (आताचे मे.भूमिराज बिल्डर्स ) यांना करण्यात आलेल्या शेकडो कोटींच्या भूखंड वाटपाला राज्य शासनाने दुसऱ्यांदा स्थगिती दिली आहे. त्यामुळे शासनाच्या निर्णयाला आवाहन देत संबंधित विकासकाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. दरम्यान या याचिकेवर अंतरीम स्थगिती मिळविण्याचे विकासकाचे स्वप्न धूळीस मिळाले आहे. या भूखंडाचा विकास करण्यास शासनाने दिलेल्या स्थगिती आदेशाला रद्दबातल करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. त्यामुळे मे. भूमिराज बिल्डर्सच्या या गृहप्रकल्पातील गुंतवणूकदार अडचणीत सापडले आहेत.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, वाघिवलीतील ६६ कुळांना डावलून सिडकोने साडेबारा टक्के योजनेतून सीबीडी येथील पारसिक हिल डोगरांच्या पायथ्याशी हजारो कोटींचा भूखंड तत्कालीन इराईसा डेव्हलपर्स आणि आताचे मे. भूमिराज बिल्डर्सला वाटप केला आहे. सिडकोचे हे भूखंडवाटप वादग्रस्त ठरल्याने संरक्षित कुळांनी न्यायालयात धाव घेवून सदर भूखंड वाटप रद्द करण्याची मागणी केली आहे. मात्र सन २०१४ मध्ये उच्च न्यायालयाने सिडकोद्वारा या भूखंड वाटप प्रकरणात विकासकावर भूखंड रद्द करण्यासारखी तीव्र कारवाई करु नये असे स्थगिती आदेश दिले होते. त्यानंतर कुळांच्या तक्रारीवरुन राज्य सरकारने गेल्या नागपूर अधिवेशनात सिडकोच्या सदर भूखंड वाटपास नगरविकास राज्यमंत्र्यांनी स्थगिती दिली होती.

विशेष म्हणजे राज्य सरकारने दिलेली ही स्थगिती गत २३ मे २०१८ रोजी नगरविकास विभागाने उठविली होती. त्यामुळे संबंधित विकासकाला महापालिकेने सुधारित बांधकाम परवानगी दिली होती. डिसेंबर २०१७ मध्ये दिलेली स्थगिती मे २०१८ मध्ये उठविताना शासनाने कोणतेही ठोस कारण न दिल्याने पुन्हा या भूखंड वाटपाविरोधात विरोधीपक्षनेते धनंजय मुंढे यांनी नुकत्याच पार पडलेल्या नागपूर अधिवेशनात लक्ष्यवेधीद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्याअनुषंगाने गत ७ जुलै रोजी राज्य शासनाने पुन्हा सदर भूखंड वाटपाला स्थगिती दिली आहे.

दरम्यान, राज्य शासनाने भूखंड वाटपास स्थगिती दिल्याने महापालिकेने देखील विकासकाला दिलेली सुधारित बांधकाम परवानगी रद्द केली आहे. राज्य शासनाने दुसऱ्यांदा सदर भूखंड वाटपाला स्थगिती देताना कारण स्पष्ट केले नसल्यामुळे मे. भूमीराज बिल्डर्स यांनी शासनाच्या या निर्णयाला स्थगिती मिळावी म्हणून उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर निर्णय देताना बुधवारी उच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्यास नकार देत यासंदर्भात नव्याने दाखल झालेल्या कुळांच्या मध्यस्थी (इंटरव्हेन) याचिकेवर संबंधित विकासक व सिडकोला आपले म्हणणे सादर करण्यास सांगितले आहे. त्यामुळे या याचिकेचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम स्थगिती मिळण्याची विकासकाची मागणी उच्च न्यायालयाने अमान्य केली आहे.

सीबीडी पारसिक हिल डोंगराच्या पायथ्याशी निसर्ग रम्य ठिकाणी असलेल्या मे. भूमीराज बिल्डर्सच्या या गृहप्रकल्पामध्ये अनेक नामवंत नागरिक व उद्योजकांनी घरांची नोंदणी करुन काट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली आहे. उच्च न्यायालयाने शासनाच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती देण्यास नकार दर्शविल्याने भूमीराज बिल्डर्सच्या या गृहप्रकल्पाचे भवितव्य धोक्यात आल्याने गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले आहेत.

# परेरानगरसाठी आठवडाभरात रेशनिंग दुकान सुरू होणार

**वार्ताहर**

वसई, दि. २८ – नायगाव पूर्व परिसराची लोकसंख्या सध्या झपाट्याने वाढू लागली आहे. अशावेळी नायगाव पूर्व परिसराला स्वतंत्र रेशनिंग दुकान आणि आधार कार्ड केंद्र नसल्याने नागरिकांना दूर अंतरावर असलेल्या आधार कार्ड केंद्रात आणि जूचंद्र येथील रेशनिंग दुकानात जावे लागत होते. यामुळे याच भागात रेशनिंगचे दुकान असावे यासाठी स्थानिकांनी वारंवार मागणी केली होती. या पाठपुराव्याला अखेर यश आले असून नायगाव पूर्व परिसरातील परेरानगर भागासाठी स्वतंत्र रेशनिंग दुकान आणि आधारकार्ड केंद्र वितरण कार्यालय लवकरच सुरू होणार आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, वसई–विरार शहर महानगरपालिकेचे स्थानिक नगरसेवक व प्रभाग समिती जी चे विद्यमान सभापती कन्हैया (बेटा) भोईर यांनी मागील ३ वर्षांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा चालू ठेवला होता. रेशनिंग दुकान आणि आधारकार्ड वितरण कार्यालयाविणा हजारो नागरिकांना खस्ता खात दुरवर जावेलागत असल्याच्या वस्तुस्थितीवर प्रशासनाने संवेदनशिलपणे विचार करावा अशी मागणी करत भोईर यांनी पाठपुरावा चालू ठेवला होता.

परेरा नगर परिसरातील नागरीकांची अडचण लक्षात घेता लोकनेते, आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सभापती कन्हैया भोईर यांनी परेरा नगर येथील नागरिकांकरीता स्वतंत्र रेशनिंग दुकानाची मागणी प्रशासनाकडे केली. सभापती कन्हैया (बेटा) भोईर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पुरवठा अधिकारी, तालुका पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय, प्रांत कार्यालय यांच्याकडे सन २०१५ ते २०१८ या ३ वर्षांच्या कालावधीत पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद लाभत परेरा नगर येथे लवकरच स्वतंत्र रेशनिंग दुकान सुरू करण्यात येणार असल्याबाबत प्रशासनाकडून कळविण्यात आलेले आहे. परेरा नगर येथे रेशनिंग दुकान सुरू करणेकामी प्रथमत: जागेची समस्या होती. परंतु शासकीय जागा उपलब्ध होईपर्यंत सभापती कन्हैया भोईर यांनी स्व–खर्चाने जागा उपलब्ध करून देण्याची तयार दर्शविली आहे.

# अल्पवयीन मुलीची चित्रफीत करुन बदनामीची धमकी

## बोरी येथील तरुणास अटक

## पेणमध्ये वाढणाऱ्या अशा घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण

**वार्ताहर**

पेण, दि. २८ – गर्भ श्रीमंत वडिलांच्या जीवावर अल्पवयीन मुलीची चित्रफीत करुन तिला बदनामीची धमकी दिल्याचा प्रकार पेणमध्ये उघड झाला आहे. या प्रकरणी पेण तालुक्यातील बोरी येथील अच्युत म्हात्रे या तरुणास पेण पोलिसांनी अटक केली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी रामवाडी येथील आहे, मात्र सध्या इंद्रनगर, वडखळ येथे राहत होती. दरम्यान अल्पवयीन मुलीस तिचा पाठलाग करुन आपल्याशी मैत्री करण्याचे व लग्न करण्याची मागणी तालुक्यातील बोरी येथील एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याचा मुलगा हा गेल्या दीड वर्षांपासून करत होता. परंतु त्यास सदर मुलीने नकार दिला.

या गोष्टीचा राग मनात धरुन पेणमधील एका मोठ्या शिक्षण संस्थेच्या हायस्कूलधील बाथरुममध्ये खिडकीच्या बाहेरुन त्या मुलीची अश्लील चित्रफित मोबाईलमध्ये बनवून ते फेसबुकवर टाकून सदर मुलीस बदनाम करण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे त्या मुलीने आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला. सदर बाब पालकांच्या लक्षात येताच त्यांनी पेण पोलीस ठाण्यांत तक्रार दाखल केल्यानंतर अच्युत म्हात्रे याच्या विरोधात भा.दं.वि. कलम ३५४, ५०६, बाल लैंगिक अत्याचार (पास्को) अधिनियम २०१२ चे ८, ११, (४), (५) १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यास अटक करण्यात आली आहे. त्याच्याजवळील मोबाईल हस्तगत करण्यात आले असून त्यात काही अश्लील चित्रफिती पोलिसांच्या हाती लागल्या आहेत. सध्या तो येथे न्यायालयीन कोठडीत आहे.

दरम्यान सदर तरुणाच्या बाबतीत वडखळ परिसरातही असे बरेच प्रकार असल्याचे वृत्त असून पोलीस त्यादृष्टीने तपास करीत आहेत.

# मराठा क्रांती मोर्चाची आज सिंधुदुर्गमध्ये बैठक

सिंधुदुर्ग, दि. २८ (वार्ताहर) – कसाल, ओसरगाव येथे झालेल्या आंदोलनानंतर पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या मराठा बांधवांवर गंभीर गुन्हे दाखल केले व गुन्हागारांना ज्याप्रकारे




पकडले जाते त्या पद्धतीने सामान्य शेतकरी गरीब मराठा आंदोलन कर्त्यांना घरात घुसून पकडले जात आहे, असा आरोप मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने करण्यात येत आहे. दरम्यान शांततेच्या मार्गाने चालू असलेले आंदोलन बदनाम करून चिरडून टाकण्याचे प्रयत्न पोलिसांनी आणि प्रशासनाने चालवले आहे. या संदर्भात विचार विनीमय करून मराठा क्रांती मोर्चा सिंधुदुर्गची पुढील दिशा ठरवण्यासाठी रविवार दिनांक २९ जुलै रोजी ओरस, सिंधुदुर्गनगरी, रवळनाथ मंदिर येथे बैठक आयोजित केली आहे. तरी सर्व मराठा बांधवांनी या मिटींगला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा समन्वयक मराठा क्रांती मोर्चा, सिंधुदुर्ग तर्फे करण्यात आले आहे.

**शुद्धिपत्र**

दिनांक २८/०७/२०१८ रोजी सदर दैनिकात प्रकाशित झालेल्या ॲड. शब्बीर एस. कपाडिया यांच्या जाहीर सूचनेमध्ये वकिलांचे नाव अनवधानाने शैलेश एस. कपाडिया असे प्रकाशित झाले आहे ते ॲड. शब्बीर कपाडिया असे वाचण्यात यावे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that my client (1) **MR. RAVIPRASAD R. TIWARI** and (2) **MR. GANESH R. TIWARI** has agreed to enter into an agreement for sale from its present owner **SMT. MANJULA PARASMAL TALESARA JAIN** Wife of Late **MR. PARASMAL CHUNILAL TALESARA JAIN** for purchasing residential property viz. **Flat No.404, admeasuring 738 sq.ft, C-Wing, 4th Floor, "Penta Galaxy Co-Operative Housing Society Ltd. S.M.D. Road, Opp. Fire Brigade, Wadala (E), Mumbai-400 037 bearing C.S. No.116(pt) (i.e.11/116) of Salt Pan Division, F/N Ward.**

Any person having any claim, mortgage, right, title, interest or whatsoever nature in respect of the said residential property or any part thereof hereby called upon to lodge their claim to the under signed with the documentary proofs within 15 days from the date of this publication, failing which, it shall be presumed that no claim exists and if any claim exist the same will be deem to be waived.

Place : Mumbai
Date : 29/7/2018

Sd/-
RAMJI B. GUPTA
(Advocate High Court)
Room No.88 8/8, Nanabhai Wadi,
Korba Mithagar, Wadala (E),
Mumbai-400 037.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, **१) श्री. आशिष दिलीप सुर्यवंशी आणि श्रीम. मीता आशिष सुर्यवंशी,** फ्लॅट क्र. ए–३०७, मोजमापित अंदाजे ४०० चौ. फू. चटई क्षेत्र म्हणजेच ४५३ चौ. फू. बिल्टअप क्षेत्र ३रा मजला, उर्मिला को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या भांडवल/मालमत्तेमधील, सहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०६९ याचे एकमेव, संपूर्ण व अनन्य मालक आणि विभिन्न क्र. ९१ ते ९५ धारक शेअर प्रमाणपत्र क्र. १९ अंतर्गत प्रत्येकी रु. ५०/– चे ५ (पाच) पूर्ण भरणा शेअर्सचे धारक असल्याचा आणि त्याचा शांततापूर्णकब्जा केल्याचा, कोणत्याही स्वरूपाच्या सर्व भारांपासून मुक्त स्वच्छ व पणनयोग्य नामाधिकारांचे धारक असल्याचा दावा करीत असून आता ते सदर फ्लॅट व सर्व त्यातील फायदे विकण्यास, हस्तांतरण, अभिहस्तांकन करण्यास व सदर फ्लॅटचा प्रत्यक्ष कब्जा माझ्या अशिलांस सोपवण्यास इच्छुक आहेत.

कोणतीही व्यक्ती, जी वर नमूद मालमत्ता आणि/किंवा त्यांचे भाग व विभाग या संदर्भात कोणताही विलेख, कागदपत्र, लेखन निष्पादित केल्यास आणि/किंवा त्याच्या संदर्भातील कोणताही विलेख, लेखन निष्पादित झाल्यास आणि/किंवा विक्री, गहाण, न्यास, धारणाधिकार, कब्जा, भेट, वारसा, रिलीज, भाडेपट्टा किंवा अशा इतर कोणत्याही मार्गे कोणताही दावा किंवा आक्षेप असल्यास तो सदर सूचनेच्या जारी तारखेपासून १४ दिवसांत त्याच्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, कसूर केल्यास असा दावा किंवा मागणी, आक्षेप किंवा अडथळे इ. कोणत्याही अशा व्यक्ती/मंडळ यांच्याकडून असल्यास त्यांच्यासाठी व/वा त्यांच्या वतीने गृहीत धरले जाणार नाही आणि माझे अशील सदर फ्लॅट त्यानुसार प्राप्त आणि खरेदी करण्यास हक्कदार असतील.

सदर दिनांकः **२९ जुलै, २०१८.**

**श्रीम. योगिनी आर. सावंत**
**वकील,**
डी–१०, दी पार्ले कॉलनी,
सहकार रोड, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई–४०० ०५७.

**PUBLIC NOTICE FOR SALE OF COAL STOCK**

Sealed bids are invited to be submitted to the undersigned at BCC House, 8/5, Manoramaganj, Navratan Bagh Main Road, Indore-452001 latest by 03:00 PM on 05.08.2018 for purchase of cargo of coal. Details of the auction are as follows -

1. Stocks of thermal coal of approximately 22,912 MT located at Magdala port (Gujarat) and approximately 11,440 MT located at Dharamtar port ( Maharashtra ).
2. The stock is to be disposed on 'lifting against advance' basis.
3. The stock will be disposed on 'as is, where is, and without recourse basis'.
4. The stocks will have to be lifted by the successful bidder between 07.08.2018 to 22.08.2018.
5. The undersigned reserves the right to cancel the auction without assigning any reason.
6. For inspection of the stock and any other clarifications, kindly contact at nos. 7600021045 (Gujarat) or 7738157506 (Maharashtra).

Sd/
**Nitin Hasmukhlal Parikh**
Resolution Professional
Date : 28.07.2018
Place : Indore
Registration No. IBBI/IPA-002/IPN00058/2017-2018/10110

**आयटीडी सिमेंटेशन इंडिया लिमिटेड**
ITD Cem
Commitment, Reliability & Quality
कॉर्पोरेट आयडेन्टिटी क्रमांकः एल६१०००एमएच१९७८पीएलसी०२०४३५
नोंदणीकृत कार्यालयः नॅशनल प्लास्टिक बिल्डिंग, ए सुभाष रोड, परांजपे बी स्कीम, विले पार्ले (पूर्व), मुंबई–४०० ०५७
दूरः०२२ ६६९३१६०० फॅक्सः ०२२ ६६९३१६२८
ईमेलःinvestors.relation@itdcem.co.in •वेबसाईटः www.itdcem.co.in

**सूचना**

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन २९ सहवाचता ४७ अन्वये याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३० जून, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहा महिन्यासाठी कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना विचारात आणि मंजूर करण्यासाठी गुरूवार, ९ ऑगस्ट, २०१८ रोजी मुंबई येथे घेण्यात येणार आहे.

सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ www.itdcem.co.in आणि www.bseindia.com आणि www.nseindia.com यावर उपलब्ध असणार आहे.

**आयटीडी सिमेंटेशन इंडिया लिमिटेड करिता**
सही/–
**(राहुल निओगी)**
**कंपनी सचिव**
दिनांकः २७ जुलै, २०१८
ठिकाणः मुंबई

multiprintindia.com

**वेस्टलाईफ डेव्हलपमेंट लि.**
westlife
**नों. कार्यालय : १००१, टॉवर–३, १० वा मजला, इंडियाबुल्स फायनान्स सेंटर, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन रोड, मुंबई–४०० ०१३.**
**सीआयएन नं. : एल६५९९०एमएच१९८२पीएलसी०२८५९३ दू. : ०२२–४९१३५००० फॅक्स : ०२२–४९१३५००१**
**वेबसाईट :** www.westlife.co.in | **ई–मेल आयडी:** shatadru@westlife.co.in

**३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

(प्रति भाग माहिती सोडल्यास ₹ लाखात)

| तपशील | संपलेली तिमाही | |
|---|---|---|
| | ३०.०६.२०१८ | ३०.०६.२०१७ |
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३४,१६७.९५ | २६,२४५.२३ |
| करपूर्व नफा/तोटा | १,२१०.३४ | (२७१.३२) |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | १,१६२.४९ | (२७१.३२) |
| भरणा झालेले समभागभांडवल –(दर्शनी मूल्य रु. २ प्रत्येकी) | ३,१११.९३ | ३,१११.४६ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | ५१,११२.५७ (३१ मार्च, २०१८ रोजीस) | ४९,६४०.८६ (३१ मार्च, २०१७ रोजीस) |
| प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक) – (दर्शनी मूल्य रु. २ प्रत्येकी) | | |
| मूलभूत | ०.७५ | (०.१७) |
| सौम्यिकृत | ०.७५ | (०.१७) |

टिपा: १) ३० जून, २०१८ रोजीस कंपनीने ऑगस्ट, २०१३ मधील समभागांच्या प्रेफरेन्शियल इश्श्युमार्फत रु. १८,००० लाख उभे केले. उभे केलेल्या एकूण निधीपैकी कंपनीने अजूनपर्यंत निधी ज्या कारणासाठी उभारला त्यासाठी रु. १७,८२५ लाख वापरले. उर्वरित रु. १७५ लाख तात्पुरते म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवले आहेत. २) सेबी (लिस्टिंग ॲन्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० जून, २०१८ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीच्या तिमाही वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. तिमाही आणि वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसची वेबसाईट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाईट www.westlife.co.in वर उपलब्ध आहे. ३) वरील निष्कर्षांना २७ जुलै, २०१८ रोजी झालेल्या त्यांच्या सभेत लेखापरीक्षण समितीने पुनर्विलोकित केले आणि संचालक मंडळाने ते मंजूर केले. ४) ग्रुप उत्तर आणि दक्षिण भारतात रेस्टॉरंटस्‌ची मॅकडोनाल्डस् शृंखला चालविते आणि व्यवस्थापनाचे म्हणणे आहे की, सदर रेस्टॉरंटस् एकाच व्यवसायात मोडतात आणि त्यामुळे एएस–१७–''सेगमेंट रिपोर्टिंग'' अन्वये विभागवार माहिती दर्शविणे आवश्यक नाही. ग्रुपचा फक्त डोमॅस्टिक मार्केटच्या गरजा पुरविण्यासाठी फक्त एकच भौगोलिक विभाग आहे. ५) अलिप्त वित्तीय निष्कर्ष कंपनीचे वेबासाईट "www.westlife.co.in" वर उपलब्ध आहेत. कंपनीच्या वित्तीय निष्कर्षाची महत्त्वाची आकडेवारी खालीलप्रमाणे:

**(₹ लाखात)**

| तपशील | संपलेली तिमाही | |
|---|---|---|
| | ३०.०६.२०१८ | ३०.०६.२०१७ |
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल (निव्वळ) | – | – |
| करपूर्व नफा | (१४.८२) | (६.५५) |
| कालावधीकरिता निव्वळ नफा/तोटा | (१४.८२) | (६.५५) |

**मंडळाच्यावतीने आणि साठी**
**(सही/–)**
**अमित जतिया**
**उपाध्यक्ष**
**डीआयएन: ०००१६८२३**

**मुंबई**
**२७ जुलै, २०१८**

**दी जम्मु ॲण्ड काश्मिर बँक लिमिटेड**
J&K Bank
Serving To Empower
बीकेसी शाखा, १ ला मजला , नॅशनल बिझनेस सेंटर, (एमएमआरडीए मैदानाजवळ) बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०० ०५१, महाराष्ट्र, भारत
फो. +९१ (०)२२ २६३२४२२१(२) (३)
फॅ. +९१ (०)२२ २६५६६२९५
ई. woorli@jkbmaol.com
वे. www.jkbank.net

**निविदा नि लिलाव विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (अधिनियम) अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ (नियम) च्या नियम ८(६) अन्वये विक्री सूचना.**

रकाना ''३'' मधील नमूद व्यक्तींच्या मालकीच्या रकाना ''४'' मधील नमूद स्थावर मिळकत/तारण मत्तेच्या खरेदीकरिता इच्छुक पक्षकारांकडून विहित निविदा दस्तावेजांवर मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर सुप्रा स्थावर मिळकत/तारण मत्तेचा कब्जा हा अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये जारी केलेल्या मागणी सूचनेला अनुसरून दि जम्मू ॲण्ड काश्मिर बँक लि. (यानंतर बँक असा उल्लेख) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे आणि सदर स्थावर मिळकत/तारण मत्ता बँकेच्या कब्जात आहे जी बँक रकाना ''५'' मध्ये नमूद तारण कर्जाच्या वसुलीकरिता ॲक्ट सहवाचता त्या अंतर्गत नियमांच्या तरतुदीन्वये विकण्यास इच्छुक आहे.

विक्री जनतेकडून निविदा मागवून करण्यात येणार आहे आणि प्राधिकृत अधिकारी त्यांच्या निर्देशाने निविदा उघडण्याच्या तारखेस पात्र निविदाकारांच्या दरम्यान लिलाव (अंतर्गत बोली) करतील. स्थावर मिळकत/तारण मत्तेची विक्री **''जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे, जे काही आहे तेथे आहे आणि विना अवलंब''** तत्त्वाने करण्यात येईल. सदर स्थावर मिळकत/तारण मत्तेच्या संदर्भात वीज थकबाकी, पाणी थकबाकी, कोणत्याही प्रकारच्या कर थकबाकीकरिता देय थकबाकी, काही असल्यास, यशस्वी निविदाकाराने भरायची आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या योग्य माहितीनुसार मिळकतीवर कोणताही अन्य बोजा अस्तित्वात नाही. तथापि, इच्छुक निविदाकारांनी बोजाच्या संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. बँक/प्राधिकृत अधिकारी कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/थकबाकीकरिता कोणत्याही मार्गाने जबाबदार राहणार नाही.

निविदा दस्तावेज आमचे बिझनेस युनिट बीकेसी, नॅशनल बिझनेस सेंटर, १ ला मजला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ (यानंतर बिझनेस युनिट बीकेसी असा उल्लेख) येथून प्राप्त करता येतील. निविदा १६.०८.२०१८ रोजी किंवा पूर्वी दु. ३.०० वा. पर्यंत सदर बिझनेस युनिटमध्ये सादर कराव्यात. निविदांना बिझनेस युनिट बीकेसी येथे १६.०८.२०१८ रोजी दु. ४.०० वा. प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे उघडण्यात येईल. इच्छुक खरेदीदार ज्यांना मिळकत/तारण मत्तेचे निरीक्षण करायचे आहे ते १४.०८.२०१८ रोजी किंवा पूर्वी स. १०.३० ते दु. ४.३० दरम्यान कोणत्याही कामकाजाच्या दिवशी ब्रांच हेड बिझनेस युनिट बीकेसी यांच्याकडे आगाऊ वेळ ठरवून करू शकतात.

निविदा दस्तावेजांमध्ये विहित विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती **जे ॲण्ड के बँक**, बिझनेस युनिट बीकेसी, नॅशनल बिझनेस सेंटर, १ ला मजला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१ येथे उपलब्ध आहेत.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | गहाणवटदाराचे नाव | मिळकत/मत्तेचे वर्णन | ३०.०६.२०१८ रोजीस थकबाकी रक्कम | राखीव किंमत (रु. लाखात) (च्या खाली मिळकत विकली जाणार नाही) | इअर निविदा दस्तावेजासह भरायची आहे (रु. लाखात) |
| १ | मे. हंजेर बायोटेक वडोदरा प्रा. लि. | सुनेहरा तोहिद फर्निचरवाला | सौ. सुनेहरा तोहिद फर्निचरवाला यांच्या नावे असलेला सुपर बिल्टअप क्षेत्र १०१८ चौ. फू. आणि बिल्टअप क्षेत्र ८४८ चौ. फू. असलेल्या मूळ सर्व्हे क्र. १६२, सीटीएस क्र. एफ/८५९, अंतिम प्लॉट क्र. ९, टाऊन प्लानिंग स्कीम क्र. III धारक जमीन मैदानावर बांधलेल्या अश्रफ मंझिल, २९ वा रस्ता, पाली मार्केटजवळ, पाली नाका, बांद्रा पश्चिम, मुंबई– ४०००५० च्या ६ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ६०२ चे गहाण | रु. ९,८३,३७,४८५.७१ सह पुढील व्याज आणि तेव्हा पासूनचे इतर लागू प्रभार, परिव्यय, खर्च | रु. २५०.०० लाख | रु. २५.०० लाख |

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता कोणतेही प्रस्ताव नाकारण्याचा हक्क राखून ठेवला आहे. **सदर प्रकाशन हे संपूर्ण थकबाकी चुकती न केल्यास वरील नमूद तारीख/ठिकाणावर विक्री आयोजनाबाबत सदर कर्ज खात्याचे कर्जदार/गहाणवटदार /हमीदार यांना १५ दिवसांची सूचना सुध्दा आहे.**

सही/–
दिनांक : २७.०७.२०१८
प्राधिकृत अधिकारी

**कार्पोरेशन बैंक Corporation Bank**
A Premier Public Sector Bank

(भारत सरकारचा उपक्रम)
**विभागीय कार्यालय – ठाणे (८८२८)**
कोरल स्क्वेअर, २ रा मजला, सुरज वॉटर पार्कजवळ, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम)–४००६१५.
फोन क्र. ०२२–२५९७५५७८ संकेतस्थळः www.corpbank.com ई–मेल : cb8828rec@corpbank.co.in

**सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत ई–लिलाव विक्री सूचना**

ज्याअर्थी कॉर्पोरेशन बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील कर्जदार/जामीनदार यांच्याकडून त्यावरील पुढील आकार व खर्च यांच्यासह येथे खाली वर्णन केलेल्या थकबाकीसाठी सुरक्षित धनकोंच्या तारण कर्जाच्या वसुलीसाठी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी) च्या कलम १३(२) अन्वये जारी केलेल्या सूचनेनुसार खालील तारण मत्तांचा कब्जा घेतला. तमाम जनतेला कळविण्यात येते की, खालील तपशिलानुसार थकबाकीच्या वसुलीसाठी खालील मिळकतींचा **''जसे आहे जेथे आहे''** आणि **''जसे आहे जे आहे''** तत्त्वाने ई–लिलाव (सरफैसी ॲक्ट अंतर्गत) करण्यात येणार आहे :–

| संच क्र. | कर्जदार व जामीनदारांचे नाव | मिळकतींचे वर्णन | शाखेचे नाव/ संपर्क क्र. | ई–लिलावाची तारीख व वेळ | राखीव किंमत | मागणी सूचनेची तारीख व कब्जाची तारीख | थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार: मे. जनरल कम्पोझिट प्रा. लि. सौ. सुषमा ए. गुलाटी श्री. पुष्कर ए. गुलाटी | फ्लॅट क्र. २२, २ रा मजला, मुनिष सीएचएस लि., प्लॉट क्र. १०९१–९२, आग्रा रोड, जॉन्सन ॲण्ड जॉन्सनसमोर, मुलुंड पश्चिम, मुंबई ४०००८०. बिल्टअप क्षेत्र ६५४ चौ. फू. | मुलुंड शाखा (१४०) श्री. राकेश मेश्राम मोबाईल क्र. ७७१००४२१४० | ०६.०९.२०१८ स. ११.४५ वा. | रु. ८१.७५ लाख | १२.०६.२०१७ आणि २३.०८.२०१७ | रु. ९४९६५८३७.४२/– (सूचनेप्रमाणे) सह त्यावरील पुढील व्याज आणि अन्य प्रभार |

| | |
|---|---|
| इसारा अनामत रक्कम (इ.अ.र.) | राखीव किंमतीच्या १०% |
| वाढीची रक्कम | रु. १०,०००/– च्या पटीत |

**अटी आणि शर्ती**

(१) ई–लिलाव **''जे आहे जेथे आहे'' आणि ''जे आहे तेथे आहे''** तत्त्वावर करण्यात येईल.
(२) लिलाव विक्री / बोली ''ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडिंग'' पध्दतीनेच https://www.bankeauctions.com या वेबसाईटद्वारे होईल.
(३) इअर रकमेसह दस्तावेजाची ऑनलाईन बोली सादरीकरणाकरिता अंतिम तारीख: ०५/०९/२०१८ रोजी दु. ३.०० पर्यंत.
(४) ई–लिलावाची तारीख आणि वेळ ०६/०९/२०१८ रोजी स. ११.४५ ते दु. ०१.१५ (भाप्रवे) प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह.
(५) इच्छुक बोलीदारांनी वैध ई–मेल आयडी धारण केलेला असावा आणि त्यांचे नाव https://www.bankeauctions.com येथे नोंदणीकृत करावे आणि त्यांचे युजर आयडी आणि पासवर्ड विनाशुल्क मे. सी १ इंडिया प्रा. लि. यांच्याकडून प्राप्त करावेत, ज्यामुळे ते ऑनलाईन ई–लिलावात सहभागी होऊ शकतात.
(६) इच्छुक बोलीदारांनी ई–लिलावासंबंधी ऑनलाईन प्रशिक्षण **मे. सी १ इंडिया प्रा.लि., प्लॉट क्र. ३०१, उद्योग विहार, फेज–२, गुरगाव, हरियाणा–१२२०१५ यांचेकडून घेऊ शकतात. हेल्पलाईन क्र. +९१–१२४–४३०२०२०/ २१/२२/२३/२४, श्री. हरीश गोवडा, दू. +९१ ९५९४५९७५५५, श्री. गणेश पाटील दू. + ९१ ९८२१६९०९६८, हेल्पलाईन ई–मेल आयडी: support@bankeauctions.com**.
(७) इसारा अनामत रक्कम (इअर) याचा आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्स्फरद्वारे **प्राधिकृत अधिकारी, कॉर्पोरेशन बँक, घोडबंदर रोड शाखा (१२९८), ठाणे खाते क्र. १२९८००२०१९९९९९, आयएफएससी कोड CORP0001298 येथील खात्यात भरणा करावी. मिळकतीचे निरीक्षण किंवा कोणत्याही माहितीकरिता कृपया श्री. उल्हास कर्वे, चीफ मॅनेजर, मोबाईल क्र. ०७०३०६५६२६२ यांना संपर्क करावा.**
(८) इअरची रक्कम ही उच्चतम/यशस्वी बोलीदारांच्या बाबतीत समायोजित करण्यात येईल, अन्यथा विक्रीच्या अंतिमतेच्या कार्यालयीन ७ दिवसांत परत केली जाईल. इअरवर कोणतेही व्याज असणार नाही.
(९) इच्छुक पक्षकार मिळकत **१८.०७.२०१८ ते २०.०७.२०१८** या वेळेत आगाऊ वेळ ठरवून पाहू शकतात.
(१०) उच्चतम/यशस्वी बोलीदाराने त्वरित रोख/डीडी/आरटीजीएस/एनईएफटी/इंटरनेट ट्रान्सफर/चेकद्वारे अगोदर भरलेले इअर वजा करून खरेदी/बोली किंमतीच्या २५% आणि उर्वरित ७५% विक्री रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे विक्रीच्या निश्चितीनंतर १५ दिवसांत (बँकेच्या वेळेत) वा लेखी स्वरूपातील मान्य असलेले आणि प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या संमतीसापेक्ष अशा वाढीव मुदतीत जमा करणे आवश्यक आहे.
(११) विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे बोली स्वीकारल्यानंतर, कसूर केल्यास इअर जप्त केली जाईल. उच्चतम बोलीदार यांना येथील नमूद मिळकतीचे यशस्वी बोलीदार/खरेदीदार म्हणून घोषित केले जातील, मात्र ते बोलीसाठी कायद्याने पात्र असावेत.
(१२) बँक लिलावाअंतर्गत मिळकतीच्या संदर्भातील कोणतेही प्रभार, धारणाधिकार, बोजा किंवा कोणतेही अन्य शासकीय किंवा कोणतीही अन्य थकबाकीकरिता जबाबदार राहणार नाही. बोलीदारांना त्याच्या वतीने सदर संदर्भात योग्य तपशील मिळविण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
(१३) विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदार/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल आणि कोणत्याही अन्य नावाने जारी करण्यात येणार नाही.
(१४) यशस्वी बोलीदाराने कायद्यानुसार मिळकतीच्या नोंदणी प्रभाराकरिता देय मुद्रांक शुल्क, प्रभार/शुल्क भरायचे आहे.
(१५) विक्री सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत विहित नियम/अटींच्या अधीन राहील.
(१६) सदर सूचनेमध्ये मिळकत विक्रीसाठी बँकेच्यावतीने काहीही अभिवेदन नाही किंवा कोणतेही वचन किंवा सादरीकरण मानण्यात येऊ नये. बँक/प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता किंवा योग्य वाटेल अशा कारणासाठी विक्री रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला आहे आणि अशा रद्द करण्यासाठी बोलीदारांना प्रश्न विचारता येणार नाहीत.
(१७) सदर प्रकाशन हे ई–लिलावाच्या तारखेपर्यंत संपूर्ण थकबाकी जमा न केल्यास वरील नमूद तारखेस ई–लिलाव विक्री करण्याबाबत सदर कर्जाचे वरील कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांना सुध्दा तीस दिवसांची सूचना आहे.

**विशेष सूचना/इशारा**

शेवटच्या मिनिट/सेकंदाला बोली लावणे बोलीदारांनी त्यांच्या स्वत:च्या हितासाठी टाळावे. अशा वेळी बोलीदार किंवा विक्रेते यांच्या बाजूने कोणत्याही चुका/त्रुटी होण्यास (इंटरनेट फेल्युअर, पॉवर फेल्युअर इ.) कॉर्पोरेशन बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार नसतील. अशा आकस्मिक समस्यांना दूर ठेवण्यासाठी बोलीदारांनी कृपा करून, बॅक–अप पॉवर सप्लायसारखी पर्यायी/आवश्यक व अन्य आवश्यक ती सर्व व्यवस्था करून ठेवावी, म्हणजेच ते अशा परिस्थितीचा सामना करून लिलावात यशस्वीपणे सहभागी होऊ शकतात.

**सही/–**
**दिनांक : २७.०७.२०१८**
**ठिकाण : ठाणे**
**प्राधिकृत अधिकारी,**
**कॉर्पोरेशन बँक**